

## माधुरी नाईक



# सप्तशृंगीगड





# सप्तशृंगीगड

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सप्तशृंगीगड

माधुरी अरविंद नाईक

ई साहित्य प्रतिष्ठान

## सप्तशृंगीगड (पर्यटन)


माधुरी अरविंद नाईक

लक्ष्मी पार्क फेज -२, बिल्डिंग नंबर ५, फ्लॅट नंबर – ६०४

लोकमान्यनगर, ठाणे- पश्चिम

मोबाईल नंबर- ९८२०२३४८९१

ईमेल- madhuri.jadhav26@yahoo.co.in

ब्लॉग : http://bhramangiri.blogspot.in/



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २३ जून २०२०



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# माधुरी नाईक यांची आजवरची प्रकाशित पुस्तके

सज्जनगड सातारा -

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sajjangad_satara_madhuri_naik.pdf

खादेरी उंदेरी जलदुर्ग -

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/jaldurga_khanderi_underi.pdf

माहुलीगड - http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/e_book_mahuligad.pdf

हम्पी बदामी ऐहोळे -

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/hampi_madhuri_naik.pdf

पुणे जिल्हा भाग १, २ व ३

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pune_jilha_1_madhuri_a_naik.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pune_jilha_2_madhuri_naik.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pune_jilha_3_madhuri_naik.pdf


इंदोर उज्जैन मध्यभारत -


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/indore_ujjain_madhuri_naik.pdf


गोवा - http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/goa_diary_madhuri_naik.pdf


ठाणे - http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/thane_madhuri_naik.pdf


सिंधुदुर्ग : http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sindhudurga__madhuri_naik.pdf



किल्ले सिंधुदुर्ग
माधुरी नाईक
अरविंद नाईक



माधुरी नाईक
गोवा डायरी



मध्य भारत
माधुरी अरविंद नाईक



हंपी बदामी ऐहोळे
माधुरी नाईक



किल्ले माहुली



माधुरी नाईक
सज्जनगड
सातारा


I ♥ THANE
ठाणे
माधुरी नाईक


दुर्ग दुर्गांची भारी
जलदुर्ग
खांदेरी - उंदेरी


पुणे जिल्हा
पुणे जंक्शन
PUNE JUNCTION
माधुरी नाईक


पुणे जिल्हा२
माधुरी नाईक


माधुरी नाईक
पुणे जिल्हा३

# माधुरी अरविंद नाईक



भटकंती सर्वांनाच आवडते. नवनवीन प्रदेश, गावं पहावी, तिथले खाद्यपदार्थ चाखावे, वेगवेगळ्या लोकांना भेटावे हे अगदी लहान मोठ्या सर्वांनाच आवडते. पण आपण जिथे जाऊ त्या ठिकाणाची माहिती देऊन इतर लोकांनाही त्या ठिकाणाची सफ़र घडवून आणायची या इच्छेने त्या प्रवासाच्या नोंदीजपून ठेवणे आणि फ़ोटो जमा करून त्या सर्वांचा उपयोग करून त्यांची ई पुस्तके बनवून लाखो लोकांना विनामूल्य देणे हा माधुरी नाईक यांचा छंद आहे. ई साहित्य प्रतिष्ठानच्या दुर्ग दुर्घट भारी आणि प्रवासवर्णन विभागाच्या मुख्य माधुरी नाईक या व्यवसायाने इंजिनियरिंग डिझायनर आहेत. त्यांचे पती अरविंद नाईक यांच्यासह त्या ई साहित्य प्रतिष्ठानच्या कोअर कमिटीच्या सभासद आहेत. आजवर त्यांची बारा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

आपणही आपल्या प्रवासाची माहिती , नोंदी आणि फ़ोटो त्यांना पाठवून अशच तऱ्हेने पर्यटकांना मदत करूया आणि महाराष्ट्राचे नाव पर्यटनामध्ये पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी हातभार लावू शकता.

हे पुस्तक समस्त भटके मंडळींना अर्पित

# सप्तश्रृंगीगड

दिवाळीमधे मंचरला ३-४ दिवसांची सुट्टी घेवून गेलो होतो. नेहमीप्रमाणे थोडा वेळ हातात असेल की लगेच कोठेतरी छोटी ट्रिप करण्याचे वेध मला लागतात. आपल्या भारतात, महाराष्ट्रामध्ये किती ठिकाणे आहेत. यादी काही संपतच नाही. मग अरविंद, भाऊ, आई, बाबा, अक्षरा, अद्वेद आम्ही नाशिकच्या वणी देवीला वन डे प्लॅन केला. प्लॅन फक्त वणी देवीचाच होता, घरच्यांसाठी! माझ्यासाठी अजून काहीतरी ॲडीशनल असतेच.

## गोंदेश्वर मंदिर

दुसऱ्या दिवशी आम्ही सकाळी ७ वाजता निघालो. सर्वात प्रथम आम्ही सिन्नरच्या गोंदेश्वर मंदिराला गेलो. गोंदेश्वर मंदिर हे महाराष्ट्र राज्याच्या नाशिक जिल्ह्यातील सिन्नर या तालुक्याच्या गावी असलेले महादेवाचे मंदिर आहे. फार कधीतरी मी सिन्नरच्या गोंदेश्वर मंदिराबद्दल ऎकले होते. आता काही पुर्वीसारखी माहिती, कात्रण घेवून फिरायला लागत नाही ते एक बरे आहे. तरी पण ठिकाणाची मुलभुत माहिती तर हवीच! तरच तुम्ही गुगल बाबा करु शकता. आणि काही ठिकाणी अगदीच नेटवर्क नसते. त्यामुळे तिथे जाण्याअगोदर आपल्याला ज्या अनवट ठिकाणांना जायचे त्यांचा अभ्यास केलेला बरा. म्हणजे आपला शोधण्यात फर वेळ जात नाही. मंचर ते गोंदेश्वर अंतर १२० किमी. आहे.

भारत सरकारने या मंदिराला महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून दिनांक ४ मार्च, इ.स. १९०९ रोजी घोषित केलेले आहे. हे मंदिर पुरातन भूमिज स्थापत्यशैली बांधकामाचा उत्तम नमुना आहे. हे मंदिर १२ व्या शतकात गवळी राजकुमार राजगोविंद याने बांधलेले आहे. हे मंदिर १२५ फुट x ९५ फुट आहे. हे मंदिर पाच मुख्य मंदिरांचा समूह असल्याने त्याला शैवपंचायतन म्हटले जाते. रथसप्तमीनिमित्त अनेक भाविक या मंदिरात येऊन सूर्यपूजन करतात. गोंदेश्वर हे मुख्य शंकराचे मंदिर आहे. तिथे आजुबाजुला अनेक मंदिरांचा समुह आहे. त्यात सुर्या, विष्णु, पार्वती, गणेश ह्यांचा समुह आहे. ह्या मंदिर समुहाला भिंतीचे कुंपण आहे. पण ते मात्र थोडे ढासळलेले आहे. मंदिराच्या एका बाजुला तलाव देखिल आहे. हे ठिकाण फार सुंदर आहे. पण त्याला फार प्रसिद्धी मिळालेली नाही. तिथे आम्ही पोहचेपर्यन्त रस्त्यात आम्हाला एकही दिशादर्शक फलक मिळाला नाही. तिथे बसलेल्या एका माणसाला विचारले की इथे काही सुविधा का नाहीत? त्यावर त्याने सांगितले की गावात दोन गट आहेत. त्यामुळे काही सुविधा होत नाही. पण आता करणार आहेत. आशा आहे की मुलभुत सुविधा आता तिथे

झाल्या असतील. गावात येताना प्रत्येक गाडीचे ३०-४० रुपये घेतले तरी गावातल्या लोंकानांच पैसे मिळतील व ते मंदिराच्या कामासाठी वापरता येतील. बाजुला असलेल्या तलावात साफसफाई करून बोटींगची सोय, बाजुला थोडी बसण्यासाठी जागा केली तरी पर्यटनाला चालना मिळेल. मंदिराजवळ खुप बाजारीकरण झाले तरी वाईट वाटते आणि अगदीच गावात असुन एकटे असले तरी भकास वाटते. आम्ही सकाळीच तिथे गेलो होतो त्यामुळे येताना नाष्ट्याची वेळ झाली होती. पण नाष्ट्यासाठी साधा वडापाव, चहाची टपरी देखिल कुठे दिसली नाही.







ह्यानंतर आमचे म्हणजे माझे पुढचे ठिकाण होते गारगोटी संग्रहालय. गाडीत सांगितले तर कोणालाच माहित नव्हते. एका एका नविन ठिकाणी घेवून जाण्याची ड्रायव्हर (नवरा आणि भाऊ ) ह्यांच्याकडून परवानगी मिळवणे म्हणजे माझ्यासाठी तरी एक दिव्य असते.

तिकडे आहे का काही बघण्यासारखे, गाडी जाते का, नक्की इकडेच आहे का? अश्या प्रश्नांची सुरुवात होते. ठिकाण जवळ आहे हे सांगितल्यावर गुगल मॅप बरोबर लावला आहे का? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे देताना परिस्थिती अगदी ताणतणावाची झालेली असते. त्यात भर म्हणजे एखादया स्थानिक व्यक्तीकडे काही चौकशी केली आणि त्याने म्हणावे असे काही इथे ठिकाण नाही. असे नकारार्थी उत्तर आले कि माझ्याकडे सगळे अजूनच शंकेने बघतात. त्यावर गुगलला माहित नसेल तेवढे मला माहित असेल हा सुखद टोमणा ऐकावा लागतो. पण शेवटी ते मला ठरलेल्या ठिकाणी घेवून जातात. तरीही कसे असेल ठिकाण हा एक प्रश्न राहिलेला असतो. चांगले स्थळ बघून सगळ्यांचाच माझ्यावर असलेला सुखद राग निघून जातो. ही परिस्थिती आमच्या प्रत्येक ट्रिप मध्ये असते. मीही तिथे पोहचेपर्यन्त तणावात असते की असेल ना ते ठिकाण बघण्यासारखे. पण नेहमीच्या ठिकांणापेक्षा आजुबाजुची थोडी वेगळी, अप्रसिद्ध ठिकाणे बघण्याची मजा काही वेगळीच असते. आणखी एखादे अनवट ठिकाण शोधल्याचा आनंद अवर्णनीयच!

अशा प्रकारे आम्ही गारगोटी संग्राहलायला येऊन पोहचलो. गोंदेश्वर मंदिर ते गारगोटी संग्रहालय हे अंतर ६ किमी. आहे.

## गारगोटी संग्रहालय

गारगोटी संग्रहालय हे मालेगावातील एम.आय.डी.सी. मध्ये आहे. गारगोटी संग्रहालय जगातील सर्वात मोठे भारतीय झिओलाइट खनिजे व क्रिस्टल्सचे उत्कृष्ट संग्रहालय आहे. हे नाशिक-शिर्डी महामार्गावर नाशिकपासून २० कि.मी. अंतरावर सिन्नर नावाच्या शहरात आहे. हे के.सी. पांडे यांनी ४० वर्षांमध्ये गोळा केलेले नैसर्गिक खनिज व रत्न नमुने यांचा संग्रह आहे. श्री. कृष्णाचंद्र पांडे हे माजी व्यापारी नौसेना अधिकारी आहेत. ह्या संग्रहालयामध्ये पृथ्वीवरील खडक, खनिज आणि स्फटिक आहेत. संग्रहालयांच्या प्रदर्शनात हिरे, कट दगड, हलका हिरवा क्यूबिकल ॲफोलाइट, पिवळ्या रंगाचा कॅल्साइटचा स्फटिका, निळा-हिरवा एक्वामारिन, कॅव्हनाइट आणि दुर्मिळ परदेशी खनिजे यांचा नमुना समाविष्ट आहे.

हे संग्रहालय डेक्कन पठार गॅलरी आणि प्रेस्टिज गॅलरी या दोन गॅलरीमध्ये विभागले गेले आहे. संग्रहालयात २ मजले आहेत आणि त्यात खनिजे आणि क्रिस्टल्सचे विशाल संग्रह आहे. आजुबाजुचा परिसर वातावरण शांत आहे. तिथे असणारा स्टाफ हा आपल्याला अगदी योग्य रित्या सर्व माहिती देतात. तिथे प्रवेश फी १०० रुपये आहे. पण संग्रहालय बघण्यासारखे आहे. तेथुन आपण विविध हार, वस्तु, खनिज नमुना, पोस्ट कार्ड चित्रे आणि बऱ्याच गोष्टी खरेदी करू शकता. सरस्वती पुरस्कार, सिन्नर गौरव हे पुरस्कार श्री. कृष्णाचंद्र पांडे यांना मिळाले आहेत. म्हणुन जेव्हा तुम्ही नाशिकला येता तेव्हा संग्रहालय पाहण्याची संधी गमावू नका.






gargoti
THE MINERAL MUSEUM






## सप्तशृंग गड / सप्तश्रृंगी देवी

गारगोटी संग्रहालय ते सप्तशृंगी हे अंतर ९१ किमी. आहे. नाशिकच्या उत्तरेस ६५ किमी अंतरावर नांदुरी हे गाव आहे तिथे हा सप्तशृंग गड म्हणजेच वणी देवी आहे. सप्तशृंगी हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. तो नाशिक जवळील नांदुरी गावाजवळ वसलेला असून अनेक कुटुंबांची कुलदैवत असलेल्या सप्तशृंगी देवीचे तीर्थक्षेत्र आहे. हे महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन पीठांपैकी अर्धपीठ आहे. ब्रह्मदेवाच्या कमंडलूपासून निघालेल्या गिरिजा महानदीचे रूप म्हणजे सप्तशृंगीदेवी असे मानले जाते. हे आदिशक्तीचे मुळ स्थान आहे असे मानले जाते. देवीचे अठराभुजा सप्तशृंग रूप येथे पहावयास मिळते. ही देवीची मूर्ती स्वयंभू आहे. येथील गाभाऱ्याला शक्तिद्वार, सूर्यद्वार आणि चंद्रद्वार असे तीन दरवाजे आहेत. या तिन्ही दरवाजातून देवीचे दर्शन घडते.

देवीला गडावर जाण्यासाठी अंदाजे ५०० पायऱ्या चढुन जावे लागते. अलिकडेच वरती जाण्यासाठी फेनिक्युलर रोपवेज चालु केले आहे. दर्शनीय ती ट्रेनच्या डब्यासारखी आहे. नविन काय आहे हे बघण्यासाठी आम्ही फेनिक्युलरने वरती जाण्याचे ठरवले. प्रती माणशी ९० रुपये हे दोन्ही बाजुचे तिकीट आहे. फेनिक्युलरने वरती जावून आले तर आपला वेळ वाचेल असा विचार केला होता. पण तिकीट घेवून आत गेल्यावर बघितले तर त्यासाठी खुप गर्दी होती. आतमध्ये साधारण १००० तरी माणसे असतील. दिवाळीची सुट्टी असल्याने अनेक लोक येथे दर्शनाला आले होते. त्यात अनेक गुजराती लोक देखिल होते. एक तासाच्या प्रतिक्षेनंतर आमचा नंबर आला. फेनिक्युलर ३ मिनिटांत वरती जाते. पण लोकांची खुप गर्दी असल्याने गडावरती लोकांना सोडत नव्हते. वरती गडावर खुप कमी जागा आहे. तरी तेथे २००-२५० लोक असतील. गडावरून पुर्ण गाव दिसते. खाली बघताना उजवीकडे दोन पाण्याची कुंडे दिसतात. सप्तश्रृंगी मंदिराचा सर्वात महत्वाचा उत्सव म्हणजे चैत्रोत्सव. हा उत्सव राम नवमीपासून सुरू होतो आणि चैत्र पौर्णिमेला (पौर्णिमेचा दिवस) संपतो, हा उत्सवाचा सर्वात मोठा दिवस. या

महोत्सवात खासकरून संतती नसलेल्या स्त्रिया मुलांसाठी देवीचा आशीर्वाद घेतात. या मंदिरात दसरा आणि नवरात्र देखील मोठ्या थाटामाटात आणि उत्साहाने साजरे केले जातात.सप्तश्रृंग येथे वास्तव्य करणारी करणारी देवी म्हणजेच सप्तश्रृंगी असे मानले आहे. दंडकारण्यात राम-सीता वनवासात असताना देवीच्या दर्शनाला आल्याचे पौराणिक ग्रंथात उल्लेखलेले सापडते. पौराणिक कथांनुसार महिषासुराचा वध केल्यानंतर देवीने विश्रांतीसाठी येथे वास्तव्य केले. महानुभावी लीळाचरित्रात असा उल्लेख आढळतो की राम-रावण युद्धात इंद्रजिताच्या शस्त्राने लक्ष्मण मूर्च्छा येऊन पडला. त्या वेळी हनुमंताने द्रोणागिरी पर्वत नेला आणि द्रोणागिरीचा काही भाग खाली पडला तोच हा सप्तश्रृंग गड होय. सप्तश्रृंग देविच्या मागील बाजुस एक अष्टकोणी कुंड आहे. या कुंडातिल पाण्याचा रंग तांबडा आहे. देवीने पानाचा विडा खाऊन टाकल्यामुळे जमिनीचा काही भाग तांबड्या रंगाचा झाला. त्यामुळे या तीर्थाला तांबुल तीर्थ म्हणतात. तसेच एक काजल तीर्थ आहे. याचे पाणी काळॆ आहे देवीने काजळ घातलेले डोळे धुतले म्हणुन यास काजल तीर्थ म्हणतात.



इथे असलेली ही फेनिक्युलर रोपवेज भारतातील पहिलीच सेवा आहे. सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेऊन बनविण्यात आलेल्या फनिक्युलर ट्रॉलीचा ट्रॅकवरील वेग, समतोल, क्षमता, अँटीलॉक ब्रेक सिस्टिमसह आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांना उतरण्यासाठी रुळाच्या एका बाजूने पायऱ्या बसविण्यात आल्या आहेत. विद्युतीकरणावर चालणारी ही ट्रॉली सिस्टिम डोंगरात उभारली गेली असून संपूर्ण वातानुकूलित आहे. वीज गेल्यास जनरेटरची सुविधा आहे. ट्रॉलीला कोकण रेल्वे पॅटर्ननुसार संरक्षणाची सोय करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत प्रवासी प्रतीक्षालय, बुकिंग ऑफिस, स्टाफ रूम, वेटिंग प्लॅटफॉर्म, स्वच्छतागृह, शौचालय, हॉटेल व इतर सुविधा आहेत. येणारी ट्रॉली व जाणारी ट्रॉली एकमेकांना समांतर असून त्यामुळे ट्रॅकवरील समतोल साधण्यात आला आहे. या ट्रॉलीमुळे वृद्ध, अपंग, बालके, महिलांना दर्शन घेणे सुलभ झाले आहे.






B B
महाराष्ट्र शासन
आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग कळवण
सुयोग गुरबक्साणी फ्युनिक्युलर रोपवेज
B

# प्रधान सेवा केंद्र - श्री क्षेत्र दिंडोरी

वणी देवीचे दर्शन घेतल्यावर गडाच्या पायथ्याशी येऊन जेवण केले. दुपारचे ४ वाजले होते. अचानक जोरात पाऊस आला. नशिब आम्ही तेव्हा जेवणासाठी हॉटेल मध्ये होतो. नंतर आम्ही नाशिकच्या दिंडोरी जिल्ह्यातील प्रधान सेवा केंद्र, श्री क्षेत्र दिंडोरीला भेट दिली. हे एक जणकल्याण सेवाभावी संस्था आहे. ह्यांचा उद्देश आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगत वैज्ञानिक दृष्टिकोन आणि भविष्यास सामोरे जाण्याचा आत्मविश्वास असलेले नविन भारतीय उभे करणे हे ह्यामागील उद्दीष्ट आहे. बऱ्याच सामाजिक संस्थानी या कार्यास मान्यता दिली आहे. त्या कामगिरीबद्दल सध्याचे परमपुज्य गुरुमाऊली यांचा गौरव देखिल करण्यात आला आहे. तेथिल दर्शन घेवून आम्ही त्यांच्या काही विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तु खरेदी केल्या. त्यांचे बालसंस्कार वर्ग हे पुस्तक छान आहे. बालसंस्कार वर्ग कसा घ्यायचा आणि प्रत्येक आठवडयाचे वेळापत्रक ह्याप्रमाणे पुर्ण वर्षाचे वेळापत्रक ह्यामध्ये दिले आहे. ते पुस्तक आम्ही खरेदी केले. ह्या संस्थेचे अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वरला आहे. त्यानंतर आम्ही तेथुन घरी जाण्यासाठी निघालो. परत एकदा पावसाचे आगमन झाले होते. रात्री १० वाजता घरी आलो. अशी थोडीशी धावपळ करून छान छोटीशी मजेदार पिकनिक संपली.



## जग सुंदर आहेच.

पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक, चित्रकार, छायाचित्रकार, कलावंत अणि कवी देतात.

**केशवसुत म्हणतात**

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य "जाणवू" लागते. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी शंभरहून अधिक पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला..." सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा.

esahity@gmail.com